नियमीत दिवाणी दावा क्र.७२/२०२३
माधवराव शिरसाठ वि. मंगेश शिरसाठ
निशाणी २१/क सोबत

**वादीतर्फे साक्षीदार क्र. १ माधवराव शिरसाठ यांचा साक्षीपुरावा**

**मी शपथेवर निवेदन करतो की,**

**पुढील सरतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री. के. डब्ल्यु. गायकवाड यांच्या मार्फत**

१०. आता मला नि.क्र.२५/४ वरील खरेदी खत दाखवण्यात आले. सदरचे खरेदी खत हे दि.३०.०९.१९९१ रोजीचे आहे. सदर खरेदी पत्रामध्ये लिहुन घेणार म्हणुन उस्मान मोहम्मद रहिम व लिहुन देणार म्हणुन माधवराव शिरसाठ अशी नावे आहेत. सर्जेराव वहाटुळे, जनार्धन खंडागळे हे साक्षीदार म्हणुन होते. तसेच साहेबराव बाबु शिरसाठ हे देखील उपस्थित होते. सदर खरेदी खतामध्ये लिहुन देणार यांची सही आहे. (वादी यांच्या विधिज्ञांनी सदरचा खरेदी खताला निशाणी देणेबाबत विनंती केली असता प्रतिवादी यांच्या विधिज्ञांनी त्याला आक्षेप नोंदवला. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. सदर खरेदी खताचे अवलोकन केले असता सदरचे खरेदी खत होवुन ३४ वर्ष झालेले आहेत. भारतीय पुरावा कायदा कलम ९० प्रमाणे सदर कागदपत्राला पुढील निशाणी देण्यात येते. प्रतिवादी यांचा आक्षेप अमान्य करण्यात येतो.) खरेदी पत्राला नि.क्र.२६ देण्यात येते.

**सरतपास पुर्ण...**

**साक्षीदाराचा उलटतपास प्रतिवादी क्र.१ तर्फे विधीज्ञ श्री. व्ही. डी. डांगे यांच्या मार्फत**

११. मी १०वी पास आहे. गट नं.४२३ मध्ये मंगेश यांची १ हे. ५६ आर पो. ख. ३ आर अशी शेतजमीन आहे, हे म्हणणे खरे आहे. मंगेश यांच्या वडीलांनी देवराव

रावजी लोखंडे यांच्याकडुन दि.२४.०४.१९९१ रोजी विकत घेतली, हे म्हणणे खरे आहे. त्याप्रमाणे मंगेश यांच्या नावाची नोंद ७/१२ पत्रकी झालेली आहे. मंगेश त्याच्यावर असलेल्या जमीनीमध्ये वहीती करतो, हे म्हणणे खरे आहे.

१२. माझी जमीन गट नं.४२२ मध्ये आहे. मंगेश ने जमीन विकत घेतली होती, त्यानंतर मी ६ महिण्यांने दावा मिळकत विकत घेतली. माझया नावाने जेव्हा जमीन खरेदी केली त्यावेळी मी औरंगाबाद येथे नसुन आर्मी येथे नोकरीस होतो. दावा मिळकत त्यावेळी मोजुन घेतली नाही, हे म्हणणे खरे नाही. मोहम्मद याचे नाव ७/१२ उता-यावर नोंद होते त्या आधारे मी खरेदी खत नोंदवले, हे म्हणणे खरे आहे. जेव्हा जमीन खरेदी केली त्यावेळी सरकारी मोजणी केली नव्हती, हे म्हणणे खरे आहे. सदरचे खरेदी खत झाल्यानंतर मी १५ दिवसांनी गावी आलो होतो. माझ्या समोर खरेदी खत झालेले नाही.

१३. गट नं.४२२ व गट नं.४२३ मंगेश यांची जमीन या दोन्ही जमीनीच्या मध्ये दक्षिण उत्तर असा बांध आहे. मंगेश माझ्या मिळकतीमध्ये असलेला बांध सामाईक आहे. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, सध्या बांध अस्थित्वात नाही.

प्रश्न - सदरचा बांध अंदाजे २ फुट रुंदीचा आहे

उत्तर -सध्या बांधच नाही.

१४. बांधाच्या पश्चिमेला माझी जमीन आहे व त्या बांधाच्या पुर्वेला मंगेश यांची जमीन आहे, हे म्हणणे खरे आहे. मी जमीन खरेदी केल्यापासुन त्या बांधाच्या पश्चिमेला माझ्या वहीती आहे व पुर्व बाजुला प्रतिवादी क्र.१ यांची वहीती आहे. गट नं.४२२ मध्ये गिरजा नदी पात्राचे पाणी जाण्यासाठी पुर्व पश्चिम पाटसरी आहे, हे म्हणणे खरे नाही. सदरची पाटसरी मी मुजवुन टाकली, हे म्हणणे खरे नाही.

१५.	मंगेशच्या गट क्र.४२३ च्या जमीनीतुन पाटसरी आजही तशीच आहे, हे म्हणणे खरे नाही. गट क्र.४२२ च्या दक्षिण बांधाकडुन पुर्वेकडे पाटसरी आहे, हे म्हणणे खरे नाही. सामाईक बांधावरील पाटसरीवरील दगड आजही तसा आहे, हे म्हणणे खरे नाही. माझ्या ७/१२ ला माझे क्षेत्र १ हे. ६४ आर पो.ख.२ आर असे आहे. मी शेवटी १५-२० दिवसांपुर्वी ७/१२ पाहिला होता. गट नं.४२२ ही वर्ग-२ ची जमीन आहे.

१६.	मंगेश प्रतिवादी क्र.१ यांनी सामाईक बांधावर अतिक्रमण केले, सामाईक बांध प्रतिवादी क्र.१ याने फोडला, हे मी खोटे सांगत आहे, हे म्हणणे खरे नाही. माझ्या शपथपत्रातील परिच्छेद क्र.२ मधील दावा मिळकतीचे क्षेत्र १ हे. ६४ आर पो. ख.२ आर सह असे खोटे नमुद कले आहे, हे म्हणणे खरे नाही. मी स्थानिक रहिवासी आहे, प्रतिवादी क्र.१ हा एक ते दिड वर्षापासुन अतिक्रमण करत आहे, हे मी खोटे सांगत आहे, हे म्हणणे खरे नाही.

१७.	गावातील तंटामुक्ती अध्यक्ष यांच्याकडे प्रतिवादी यांनी अतिक्रमण काढुन घ्यावे म्हणुन लेखी अर्ज केला नव्हता. तंटामुक्तीने मला तुमची मोजणी करुन घ्या व अतिक्रमण काढुन घ्या असे लेखी काही दिले नव्हते. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, तोंडी सांगितले होते. अशा प्रकारे त्यांचे कागदपत्र नसल्यामुळे मी खोटे सांगत आहे, हे म्हणणे खरे नाही. दि.२३.०३.२०२२ रोजी भुमी अभिलेख यांच्याकडुन मोजणी केली, नकाशा तयार केला, कोणत्या बाजुने किती आर जमीन अतिक्रमीत केले हे नमुद केलेले नाही, १४-१५ गुंठे अतिक्रमण केले, माझी १४-१५ गुंठे जमीन कमी भरते, हे मी खोटे सांगत आहे, हे म्हणणे खरे नाही.

१८.	माझे व प्रतिवादी यांचे चांगले संबंध आहेत व प्रतिवादी क्र.१ हा माझा मावस भावाचा मुलगा आहे. एक वर्षापुर्वी पाणी सोडण्याच्या कारणावरुन आमच्यात वाद झाला होता, बाकी वाद काही नाही. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, मोजणीवरुन

वाद आहे. दि.११.०७.२०२३ रोजी प्रतिवादी क्र.१ यांच्याकडे ताबा मागितला असता त्यांनी अतिक्रमीत क्षेत्र दिले नाही म्हणुन सदरचा दावा दाखल केला, हे मी खोटे सांगत आहे, हे म्हणणे खरे नाही. मी खोटे शपथपत्र दाखल केले, हे म्हणणे खरे नाही. मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे, हे म्हणणे खरे नाही.

प्रतिवादी क्र.१ तर्फे उलटतपास पुर्ण**......**

**प्रतिवादी क्र.१ तर्फे फेरतपास नाही......**

प्रतिवादी क्र.२ ते १३ यांचा व वकीलांचा पुकारा केला असता गैरहजर**.** अभिलेखावर कोणताही अर्ज नाही**.**

**उलटतपास नाही.**

**फेरतपास नाही.**

**फुलंब्री**
दि. ०९/०२/२०२६.

**श्रवणोत्तर स्विकृत**
सदरचा जबाब माझ्या समक्ष नोंदवण्यात आला.

CHANDRAKANT RAMCHANDRA PATIL
Digitally signed by CHANDRAKANT RAMCHANDRA PATIL
Date: 2026.02.09 17:07:48 +0530

**(चंद्रकांत रामचंद्र पाटील)**
**सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,**
**फुलंब्री**